## अनुक्रमणिका


१) डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे मुल्यगर्भ शैक्षणिक विचार 8
**डॉ अर्जुन गंगाराम नेरकर**

२) डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्रवादी आर्थिक विचार 13
**प्रा.डॉ. उत्तम अप्पासाहेब पठारे**

३) डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजीक समतेचे विचार 17
**प्रा. संतोष सुखदेव ठाकरे**

४) डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रीमुक्तीवादी विचार 26
**प्रा.एस.पी. उमरीवाड**

५) डॉ बाबासहेब आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना 34
**प्रा. कौसल्ये एस.जी.**

६) भारतीय राज्यघटना आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर 43
**प्रा. अर्जुन मोरे**

७) डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाही संबंधीचे विचार 48
**प्रा.आनेराव एम.एम.**

८) शेतकऱ्यांचे हितकरी - डॉ बाबासाहेब आंबेडकर 53
**डॉ विजयकुमार बाबळे**

९) डॉ बाबासाहेब ओाडकर भारतीय संवीधानाचे शिल्पकार 57
**डॉ पी.एस.लोखंडे**

१०) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार... 62
**प्रा. लक्ष्मण एस. पवार**

११) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक विचार - **प्रा. डॉ. मनोहर कुंडलिक थोरात** 75

१२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार 82
**बोंवले राजू बालासाहेब**

१३) डॉ. आंबेडकरांचे सामाजिक लोकशाहीसंबंधी विचार 91
**प्रा.डॉ. माधव केरबा वाघमारे**

१४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे परराष्ट्र धोरण एक विश्लेषण 95
**प्रा. डॉ. डोंगरे एल.बी.**

१५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धर्मविषयक विचार आणि धर्मांतर 104
डॉ डी के कदम

१६) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक न्याय विषयक दृष्टीकोणाचा विश्लेषणात्मक अभ्यास-**डॉ. सुनिल नाना संदानशिव** 113

१७) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची हैदराबाद स्वातंत्र्य लढ्यातील भूमिका आणि योगदान - **प्रा.डॉ. वसंत कदम** 120

१८) मला भावलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर 131
**कांबळे विकास यशवंता**

१९) आंबेडकर चळवळ आणि दलित स्त्रियांचे मानावाधिकार 143
**छाया भिमराव उमरे**

२०) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार 150
**महेश गजेंद्र रंदिल**

२१) भारतीय शिक्षा में आंबेडकर जी का योगदान 156
**डॉ. शेख शहेनाज अहेमद**

२२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर का लोकतांत्रिक चिंतन 166
**डॉ. शिवाजी नागोबा भदरगे**

२३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर के विचारों मे राष्ट्रहित 170
**प्रा. कैलास काशिनाथ बच्छाव**

24) Why Caste Matters in India? 175
**Mr. Swapnil Alhat**

25) The Role of Hindu Code Bill in the Empowerment of Women in India - **Dr. Ingole Ramesh Jankiram** 180

26) Dr. Babasaheb Ambedkar's Idea of Democratic Society 189
**Mr. Keda N. Wagh**

27) IMPORTANCE OF THE PERSPECTIVE OF DR. BABASAHEB AMBEDKAR TOWARDS BRAHMINS AND BRAHMANISM. IN TODAYS CONTEXT: A NEED OF HOUR FOR THE CONSERVATION OF SOCIAL ENVIRONMENT IN INDIA. 192
**Dr. Krishnanand Patil**

28) Dr.BabasahebAmbedkar's Views on Problem of Small Land Holdings in India and Remedies - **H. P. Wangarwar.** 205

29) Reflection of caste-system in Indian society in Dr. Babasaheb Ambedkar's works - **Mr. Mupade Parmeshwar Tukaram** 212

30) "Dr. Babasaheb Ambedkar's Contribution to Indian Economy" 219
**Dr. Ingle Sangapal Prakash**

राष्ट्रनिर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर
संपादक - डॉ. लक्ष्मण भीमराव डोंगरे

**सर्व हक्क :**
संपादक डॉ. लक्ष्मण भीमराव डोंगरे

**प्रथम आवृत्ती :**
१ जानेवारी २०२२

**प्रकाशक**
विजय टेकवार
शिवानी प्रकाशन
माळवाडी हडपसर, पुणे

**अक्षर जुळवणी व मुखपृष्ठ**
संतोष जाधव
ओम ग्राफिक्स,
संभाजी चौक सिडको नविन नांदेड

**मुद्रण स्थळ**
आर्टी ऑफसेट, लातूर

किंमत - १९०/-
ISBN – 978-93-85426-68-1



## संपादकीय

एक महान कायदे पंडित तत्त्वज्ञानी, बुध्दी प्रामाण्यवादी युगपुरूष एक महान क्रांतीकारक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सर्व विश्वात ओळख आहे. राज्य; धर्म, समाज, शेती, जात, शिक्षण, संस्कृती, शासन, लोकशाही या सारख्या घटकाची चिकित्सा करून सामाजिक न्याय आणि सामाजिक समतेच्या प्रस्थापणेसाठी त्यांनी अविरत प्रयत्न केले आहे. भारतातील चातुर्वण्यावर आधारीत विषमतावादी समाजातील प्रथा, परंपरा, संस्कृतीच्या विरोधात सामाजिक क्रांती करून सामाजिक परिवर्तनाचा मार्ग प्रशस्त केला. सामाजिक परिवर्तनाच्या माध्यमातून समताधिष्ठित, शोषणमुक्त, जातिविहीन समाजव्यवस्थेचे स्वप्न पाहिले होते. या स्वप्नपुर्तीसाठी त्यांनी आपले सर्वस्वपणाला लावले होते. यामूळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार आजही प्रस्तुत आणि महत्त्वाचा वाटतो. म्हणून आजच्या वर्तमान काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार कालबाह्य वाटत नाही तर कालसुसंगत वाटतो. हे विशेष आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय राज्यघटना निर्मितीत योगदान हे अद्वितीय आहे. विविध जाती, भाषा, प्रांत, धर्म, वर्ग, वंश असणारा देश ७३ वर्षापासून एकसंघ एकात्मतेने आणि बंधुभावाने एकत्र आहे. या पाठीमागे घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची दुरदृष्टी दिसून येते. त्यांनी लोकशाही भारताच्या निर्मितीत दिलेले योगदान अतुलनिय आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य सामाजिक आणि राजकिय कार्यक्षेत्रापुरते सिमित नाही तर त्यांच्या सामाजिक व राजकिय तत्त्वज्ञानाच्या माध्यमातून जात, धर्म, संस्कृती यांची चिकित्सा करण्यासाठी विद्रोह वेदना, नकाराच्या माध्यमातून दलित साहित्य हे साहित्य क्षेत्र आंबेडकरवादामुळे निर्माण झाले. दलित साहित्याने भारतीय साहित्याला नविन आयाम व नवी दिशा व भाषा मिळवून दिली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार व कार्यामुळे बुध्द, फुले, कबीर या गुरूंचा व्यापक असा प्रभाव दिसून येतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुभाव यावर आधारीत समतावादी समाज निर्माण करण्यासाठी त्यांनी महाडचा सत्याग्रह, काळाराम मंदिर प्रवेश, स्वातंत्र्य मतदार संघ, स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापणा, मनुस्मृतीचे दहन, हिंदू कोडबिल, बौध्द धर्माचा स्विकार इत्यादीच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठीचे त्यांचे योगदान अद्वितीय आहे.

भारतीय समाजात लिंगभेदामुळेवंचीत उपेक्षित स्त्रियांना समान हक्क स्वातंत्र्य प्रदान करून समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताचे कायदेमंत्री असतांना संसदेत मांडलेला हिंदू कोडबील हे महिलांच्या हक्क स्वातंत्र्यासाठी घेतलेली महत्त्वाची भुमिका होती. विवाह घटस्फोट, वारसा, दत्तक पोटगी,

12) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार...

बोंबले राजू बालासाहेब (ग्रंथपाल)
हु तात्मा जयवंतराव पाटील
महाविद्यालय हिमायतनगर

सार :-

*मागासवर्गीयांच्या शिक्षणासंदर्भात बाबासाहेबांनी जे चिंतन केले तेही तितकेच मूलगामी स्वरूपाचे आहे. ज्ञानाअभावी व्यक्ती आणि समाजाचे नुकसान जसे होते, तसेच एखादी व्यक्ती वा समूहाला शिक्षण नाकारणे म्हणजे माणूस म्हणून त्याचे अस्तित्व नाकारून त्याच्या क्षमता मारून टाकणे होय, अशी बाबासाहेबांची शिक्षणविषयक धारणा होती. बाबासाहेबांना उच्चशिक्षणाद्वारे समता, स्वातंत्र्य, बंधुभाव ही मानवी मूल्ये स्वीकारलेला एक स्वाभिमानी आधुनिक समाज निर्माण करायचा होता. बाबासाहेबांच्या शैक्षणिक चळवळीचा हाच खरा मूलाधार होता. सर्व सामाजिक दुखण्यावर उच्चशिक्षण हेच एकमेव औषध आहे, असे डॉ. आंबेडकरांनी एका सभेत म्हटले होते.*


**प्रास्ताविक :-**

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी शस्त्र आहे. शिक्षणाने माणसाला आपले कर्तव्य व हक्कांची जाणीव होते. समाजातील अस्पृश्य समाजाला स्वत्वाची जाणीव व्हावी यासाठी आंबेडकरांनी शिक्षणाचे महत्त्व समाजात विशद केले. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. जो प्राशन करेल तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही, असे त्यांनी उदगार काढले. प्राथमिक शिक्षण हे सर्व शिक्षणाचा पाया आहे, म्हणून हे शिक्षण अतिशय दर्जेदार व



गुणवत्तेचे असावे असे सांगत. प्राथमिक शिक्षणाचे ध्येय असे असले पाहिजे की, मुलगा किंवा मुलगी एकदा शाळेत दाखल झाली की, तो किंवा ती पूर्णपणे शिक्षित, संपन्न बनते. समाजाच्या सर्व स्तरापर्यंत शिक्षण गेले पाहिजे. शिक्षण प्राप्त झाल्याने व्यक्तीचा सर्वांगीण विकास होतो. व्यक्तीला चांगले आणि वाईट यातील फरक समजायला लागतो. प्रज्ञा, शील आणि करुणा हे गुण प्रत्येकाच्या अंगी आणण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता प्रतिपादित केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार...




डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाच्या बळावर संपूर्ण विश्वात ओळख निर्माण केली. भारतीय समाजव्यवस्थेत अस्पृश्य समजल्या गेलेल्या समाजाला सन्मानाचा दर्जा प्राप्त करून दिला. शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही ही त्यांची कायम भूमिका राहिली आहे. डॉ. आंबेडकरांनी वंचित, उपेक्षित, दुर्लक्षित दलित अस्पृश्य समाजाला शिक्षणाचे महत्त्व पटवून सांगितले

शिक्षणाच्या अभावामुळे आपला दर्जा कसा खालावला आहे, याचे भान करून दिले. गरीब समाजातील दलित मुलां - मुलींना उच्च शिक्षण घ्यावे यासाठी त्यांनी आयुष्यभर धडपड केली. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत मिळावे यासाठी भारतीय राज्यघटनेत तरतूद केली. शिक्षण व विद्या या गोष्टींशिवाय आपला उध्दार होणार नाही असे त्यांचे स्पष्ट मत होते. भारतीय शिक्षणव्यवस्था धर्मजातीमुळे अस्पृष्य समाजाला दूर लोटते त्यांनी शिक्षण घेवू नये, शिक्षण घेणे ही वरिष्ठ समाजाची मक्तेदारी आहे, असा संकेत होता. त्यांनी स्वत: प्रयत्नपूर्वक व संघर्षातून उच्चशिक्षण परदेशातून प्राप्त केले. डॉ. आंबेडकरांनी आपल्या शिक्षणाच्या बळावर समाज परिवर्तनाचे कार्य केले. दलित समाजातील लोकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देवून ते ग्रहण करण्यासाठी अट्टहास केला. केवळ शिक्षण घेवून स्वउन्नती साधायची नाही तर शिक्षण प्रसार करण्याची मोठी जबाबदारी शिक्षित वर्गावर आहे, असे ते निक्षून सांगत होते.

**1) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची शैक्षणिक भूमिका**

भारतीय आणि पाश्चात्य अभ्यासकांनी मांडलेले शैक्षणिक दृष्टिकोन अभ्यासता त्यात सर्वसमावेशकता अल्प प्रमाणात दिसून येते. कार्यवाद, आदर्शवाद आणि निसर्गवाद या तीन सिद्धांताचा विचार केल्यास डॉ. आंबेडकरांनी या सिद्धांतच्या पलीकडे जावून सिद्धांत मांडला. त्यांनी शिक्षणात मानवतावादाचा सिद्धांत मांडला. गौतम बुद्धांनी शिक्षण व्यवस्थेची सांगितलेली मूल्ये डॉ. आंबेडकरांनी प्रत्यक्ष कृतीमध्ये आणली. भारतीय शिक्षण प्रणालीत नव सिद्धांताची मांडणी केली. प्रस्थापित



शिक्षण व्यवस्थेत स्त्री - पुरुष असा भेद होता. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नाकारण्यात आला होता. महात्मा फुलेंनी स्त्री - पुरुष शिक्षणाचा पुरस्कार केला. मुलींसाठी पुण्यात पहिली शाळा काढली, तर डॉ. आंबेडकरांनी मुलं आणि मुली यांना प्राथमिक शिक्षणाची कायद्याने सक्ती केली. गौतम बुद्ध व महात्मा फुले दोन्ही डॉ. आंबेडकरांचे गुरू होते. त्यामुळे त्यांच्या विचारांचा वारसा डॉ. आंबेडकरांच्या विचारात व कृतीत दिसून येतो. डॉ. बाबासाहेव आंबेडकरांनी १९२० मध्ये बहिष्कृत वर्गाच्या परिषदेमध्ये मुला- मुलींना प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यात यावे, ही भूमिका मांडली. प्राथमिक शिक्षणाचा प्रसार कसा महत्त्वाचा ठरतो या विषयी ते म्हणतात की, प्राथमिक शिक्षणाचा प्रसार हा राष्ट्रीयदृष्ट्या अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. सध्याच्या युगात ज्या देशात बहुजन समाज निरक्षर आहे अशा देशाचा जीवन कलहात टिकाव लागायचा नाही. शिक्षणाचे सार्वत्रिकरण का गरजेचे आहे या विषयीचा दृष्टिकोन यातून दिसून येतो.

2) डॉ. आंबेडकरांचा शिक्षणातील निसर्गवाद:-

डॉ. आंबेडकरांचा शिक्षणातील निसर्गवाद म्हणजे केवळ निसर्गावर अवलंबून राहणे नव्हे तर निसर्गातील आपण एक घटक आहोत त्यानुसार इतरांवर अवलंबून आले. इच्छा आल्या. आकांक्षा आल्या मग त्या पूर्ण करण्यासाठी स्वत: प्रयत्न करावे लागतात आणि हेच निसर्गवादातील सत्य आहे. शिक्षणाचे मानवी जीवनातील स्थान, महत्त्व, ध्येय आणि उपयोगिता सिद्धांताच्या माध्यमातून मांडण्यात आले. डॉ. बाबासाहेब

आंबेडकरांपूर्वी काही पाश्चात्य व भारतीय अभ्यासकांनी ते विशद केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रचलित शिक्षणविषयक सिद्धांताचा प्रत्यक्ष जीवनाशी सहसंबंध जोडला. प्रचलित सिद्धांतात काही बदल सुचविले. नवा शैक्षणिक सिद्धांत मांडला. संपूर्ण मानवजातीला शिक्षणाची गरज, महत्त्व व उपयुक्तता पटवून दिली. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शिक्षणविषयक दृष्टिकोन सत्याशी भिडणारा शाश्वत स्वरूपाचा आहे. शिक्षणविषयक सिद्धांतापैकी निसर्गवाद हा देखील एक पाश्चात विचारवंतानी मांडलेला सिध्दांत आहे. निसर्गवादाची संकल्पना इंद्रियजन्य अनुभवावर आधारित आहे. ही संकल्पना ऑरिस्टॉटल, बेकन हॉब्जलॉक, रूसो, थॉमस हर्बट, सॅम्युअल बटलर. बनार्ड शॉ, , फ्रोबेल, कॉम्युन्स या अभ्यासकांनी विशेषतः मांडली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजव्यवस्थेत निसर्गवादाचे शैक्षणिक पारूप कष्टमय पद्धतीने रुजविले. शिक्षण हा सर्वाचा अधिकार आहे. भारतीय राज्यघटनेत तशी तरतूद केली. हजारो वर्षांची शैक्षणिक मक्तेदारी मोडून काढली. शिक्षणावर व्यक्तीची योग्यता ठरते. जातीवर नाही हा विचार त्यांनी भारतीय समाजव्यवस्थेत रूजविला. अमूक एक जातीचा म्हणून त्याला शिक्षणापासून दूर ठेवणे म्हणजे निसर्गनियमांचा भंग करणे होय हा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वप्रथम भारतात मांडला. शिक्षण व्यक्ती महत्त्वाचा विकास होतो ही बाब तथाकथित समाजाच्या लेखी नव्हती. डॉ. आंबेडकरांच्या



प्रयत्नातून, संघर्षातून भारतीय समाजव्यवस्थेत निसर्गवादाचा सिद्धांत रूजला.

3) शिक्षणाविषयक संविधानात्मक विचार तरतुदीः-

"शिक्षण म्हणजे, सर्वसामान्यांचे प्रबोधन. संघटन म्हणजे, जनसामान्यांचे संघटन आणि संघर्ष म्हणजे, सर्वसामान्य माणसाने प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध पुकारवयाचे बंड होय. व्यक्तीला अन्यायाविरुद्ध उठाव करण्याचे सामर्थ्य आणि जाणीव केवळ शिक्षणामुळेच होते." असा बाबासाहेबांचा विश्वास होता. त्यामुळे घटनेच्या ४५व्या कलमान्वये वयाची १८ वर्षे पूर्ण होईपर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची जबाबदारी शासनव्यवस्थेची असल्याची तरतूद त्यांनी केली. शिक्षणात धार्मिक प्राबल्य निर्माण होऊ नये. यासाठी घटनेतील २८व्या कलमान्वये पूर्णत राज्याच्या पैशातून चालविल्या जाणाऱ्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणतेही धार्मिक शिक्षण दिले जाणार नाही. अशी तरतूद बाबासाहेबांनी केली. बाबासाहेब म्हणतात. "सर्व जाती-जमातींना समानतेच्या एका पातळीवर आणण्याचा एकमेव उपाय म्हणजे असमानतेचे तत्त्व नाकारणे हा आहे." भारतीय संविधान भाग ४ मध्ये ३६ ते ५१ यात निर्देशक तत्त्वे प्रस्तुत करण्यात आली. त्यातील क्र. ३८ मध्ये लोककल्याणाचे संवर्धन करण्यासाठी समाजव्यवस्थेत प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्नशील राहील.

4) मूल्याधिष्ठित शिक्षणाद्वारे चारित्र्य संवर्धनः-

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, 'शिक्षण मूल्याधिष्ठित असावे. बालकांच्या मनावर शिक्षणाचा प्रभाव योग्य प्रकारे झाला

पाहिजे. शिक्षणाने त्याग, मानवता, विनम्रता, दुसऱ्यांची जाणीव, नैतिकता अशी मानवी मूल्ये विद्यार्थी मनावर रुजविली पाहिजे. जीवनाला मूल्यांची जोड असणे गरजेचे आहे. कारण मूल्य शिकविली जात नाहीत. विद्यार्थ्यांमध्ये उपजत असलेल्या मूल्यांचा विकास केल्यास चारित्र्य संवर्धन होईल. उत्तम चारित्र्य असणारी व्यक्ती लोकशाहीचे खरे संरक्षक ठरतात."

महिला कल्याण व स्वातंत्र्याला शिक्षणाने गती मिळते : केंद्रीय मंत्री असताना, 'हिंदू कोड बिल संसदेत मांडले. मात्र, संसदेत ते विधेयक फेटाळले गेल्याने मंत्रिपदाचा राजीनामा देणारे बाबासाहेब असे उदाहरण जगाच्या इतिहासात महिला स्वातंत्र्याविषयी आढळून येत नाही. घटनेतील 'कलम ३९(क)'नुसार उपजीविकेचे पुरेसे साधन मिळण्याचा हक्क स्त्री-पुरुष सर्वांना समान आहे.

5) मागासवर्गीयांचे शिक्षण:-

कलम १७ नुसार अस्पृश्यता नष्ट करण्यात आलेली आहे. अस्पृश्यतेचे कोणत्याही स्वरूपातील आचरण निषिद्ध करण्यात आले आहे. 'अस्पृश्यतेतून उद्भवणारी कोणतीही नि:समर्थता लादणे हा कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध आहे. कलम १४ नुसार : राज्य कोणत्याही व्यक्तीस भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्यापुढे समानता अथवा संरक्षण नाकारणार नाही. कलम १५ नुसार : राज्य कोणत्याही नागरिकांना प्रतिकूल होईल. अशाप्रकारे केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान अशा कारणांवरून भेदभाव करणार नाही. सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गाच्या उन्नतीसाठी विशेष



तरतूद केली जाईल. कलम १६ नुसार : १६(१) राज्याच्या नियंत्रणाखालील कोणत्याही पदावरील सेवायोजना अथवा नियुक्ती करताना यासंबंधी सर्वांना समान संधी असेल. १६(४)नुसार राज्यांच्या सेवांमध्ये पर्याप्त प्रतिनिधित्व नाही, अशा मागासवर्गीयांसाठी नियुक्ती किंवा पदे राखून ठेवण्यास कोणतीही तरतूद करण्यात राज्यास प्रतिबंध नसेल. कलम ४६नुसार : राज्य जनतेतील दुर्बल घटकांचे विशेषतः अनुसूचित जाती-जमातींच्या वर्गाला नियुक्ती, बढतीसाठी आरक्षण देण्यासाठी प्रतिबंध राहणार नाही.बाबासाहेब म्हणतात, "शिक्षण व्यक्तीच्या शरीरात भिनले पाहिजे. त्यामुळे त्याचे मन व शरीर सुदृढ राहील. शिक्षणाअभावी व्यक्ती पशुवत होईल म्हणून व्यक्तीला शिक्षणाची गरज आयुष्यभर राहते." स्वतः बाबासाहेबांनी स्वतः अतिउच्च शिक्षण घेऊन संपूर्ण जगासमोर आदर्श निर्माण केला.

निष्कर्ष:-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जातीय व्यवस्थेची चटके सहन करीत आपले शिक्षण पूर्ण केले. शिक्षणाशिवाय वंचित, दलित, अस्पृश्य समाजाचा विकास होणार नाही याची जाणीव त्यांना झाली. त्यांनी वंचित वर्गासाठी फक्त शैक्षणिक विचार मांडला नाही तर त्यांनी मुंबई आणि औरंगाबाद येथे महाविद्यालयाची स्थापना केली. यामुळे दलित, अस्पृश्य समाजातील मुलांना शिक्षणाचे हक्काचे व्यासपीठ मिळाले. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मोठे शिक्षण तज्ञ होते. शिक्षणाविषयी व्यापक विचार मांडून त्या विचारांना घटनेत

तरतुदीच्या माध्यमातून घटनाबद्ध केले. 2009 ला The List Right to Education हा त्याचाच परिपाक आहे

संदर्भसूची:-

1) पानतावणे गंगाधर :- मूकनायक :- निर्मल प्रकाशन :- नांदेड
2) https://mr.wikipedia.org/s/3t3y
3) तरुण भारत संपादकीय...
4) डॉ. बाबासाहेब आंबेडकर :-धनंजय कीर :-
5) बी.सी. कांबळे :- समग्र आंबेडकर चरित्र :- सुगावा प्रकाशन :- पुणे
6) www. डॉ. बाबासाहेब आंबेडकर
7)https://www.deshdoot.com/trends/blog-on-dr-babasaheb-ambedkar-birth-anniversary



## 13) डॉ.आंबेडकरांचे सामाजिक लोकशाहीसंबंधी विचार

**प्रा.डॉ.माधव केरबा वाघमारे,**
**राज्यशास्त्र विभाग प्रमुख, कै.न्हानाभाऊ मन्साराम तुंकाराम पाटील कला महाविद्यालय, मारवड ता.अमळनेर जि.जळगांव**

**प्रस्तावना –**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारताला दिलेली एक अभूतपुर्व देणगी म्हणजे भारतीय लोकशाही होय. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाही विचार हे व्यावहारिक आहेत कारण त्यांनी सभोवतालच्या सामाजिक आथिक वास्तव्यासंदर्भात लोकशाहीची चर्चा करून आपला लोकशाही विचार स्विकारला आहे. डॉ. आंबेडकरांची लोकशाहीवर प्रचंड निष्ठा होती. भारतात परिवर्तन घडवून आणण्यासाठी लोकशाहीची आवश्यकता आहे म्हणून त्यांनी लोकशाहीचा स्वीकार व समर्थन केले. लोकशाहीद्वारे मतदान, राष्ट्रीय पक्ष, विरोधी पक्ष चर्चेद्वारे विषमता दूर होईल असे त्यांना वाटत होते त्याच बरोबर स्वातंत्र्य, समता व बंधुता, न्याय याद्वारे भारतीय लोकशाही मजबूत बनवण्याचे कार्य त्यांनी केले. म्हणून भारतात लोकशाही रुजविण्याचे श्रेय डॉ.आंबेडकरांना जाते. प्रस्तुत शोध निबंधाच्या माध्यमातून डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असलेली सामाजिक लोकशाही विचाराचा परामर्श घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**डॉ.आंबेडकरांचे लोकशाही विचार –**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कट्टर लोकशाहीचे पुरस्कर्ते होते. इंग्लंड अमेरिका या देशात असतांना त्यांच्यावर पाश्चिमात्य उदरमतवादी विचारांचा प्रभाव होताच. त्यातून शासनाचा चांगला प्रकार म्हणून लोकशाहीवर प्रचंड विश्वास होता. डॉ. आंबेडकरांचे लोकशाही विचार हे पाश्चात्य विचारांबरोबरच भारतातील सामाजिक आर्थिक तसेच राजकीय परिस्थितीच्या जाणिवेतून अभ्यासातून तयार झाले होते. त्यांचा शासन व्यवस्थेचा प्रकार म्हणून फॅसिस्टवाद, साम्यवाद, मार्क्सवाद राजेशाही ऐवजी लोकशाही हीच सामान्य माणसाला प्रतिष्ठा मिळवून देण्यात लोकमतांचा आदर राखण्यात चर्चेद्वारे प्रश्न सोडविण्यास व्यक्तीला व्यक्तीमत्वाचा विकास करून घेण्यास महत्वाचा शासनप्रकार आहे असे ठाम मत त्यांचे होते. 26 जानेवारी 1950 पासून भारतात लोकशाही युगाला प्रारंभ झाला. डॉ. आंबेडकरांनी भारतातील जनतेच्या हितासाठी संसदेत लोकशाही पध्दतीचा राज्यघटनेद्वारा स्वीकार केला. लोकशाहीचा अर्थ स्पष्ट करतांना डॉ.आंबेडकर म्हणतात की, रक्तविहीन मार्गाने समाजाचा आथिक व सामाजिक विकास घडवून आणणारी राज्यप्रणाली म्हणजे लोकशाही. ही लोकशाही भारताला नवी नाही. कारण ते म्हणतात, एक काळ असा होता की, भारत हा लोकसत्ताक राज्यांनी बहरला होता. बुध्द काळात लोकशाही होती म्हणून ते बुध्दाला लोकशाहीचा प्रणेता मानतात. मानवी जीवनाच्या विकासासाठी स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय महत्वाचे आहे म्हणून त्यांनी भारतीय लोकशाही मजबूत बनविण्याचे कार्य केले.